N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नंदुरबार शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0677 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/08/2023 00:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगळवार **Date From (दिनांक पासून):** 08/08/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/08/2023
**Time From (वेळेपासून):** 16:22 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/08/2023 **Time (वेळ):** 00:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/08/2023 00:25 बजे

4. **Type of Information (माहितिचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.500 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती, नंदुरबार,नंदुरबार, 425412

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सिताराम तुकाराम चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | प्लट नं 94,कोरीट नाका,विमल विहार,नंदुरबार,नंदुरबार,नंदुरबार शहर, नंदुरबार,महाराष्ट्र,425412,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | प्लट नं 94,कोरीट नाका,विमल विहार,नंदुरबार,नंदुरबार,नंदुरबार शहर, नंदुरबार,महाराष्ट्र,425412,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9579226407

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दादाभाइ फुला पानपाटील | | | 1. शिरुरण,नंदुरबार,नंदुरबार शहर, नंदुरबार,महाराष्ट्र,भारत-425412 |
| 2 | सुखदेव चुरसिंग वाघ | | | 1. प्लट नं 1,डोळ शिवार,शनिराज नगर,नंदुरबार,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत-425412 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):



Scanned with CamScanner

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 7000 रोख रक्कम | 7,000.00 |
| 2 | इतर | घरगुती वस्तु | आरोपी न.1 याची नेसुस पॅंट | 0.00 |
| 3 | इतर | घरगुती वस्तु | फिर्यादी यांच्या नेसुस शर्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकुण मुल्य (रु. मध्ये)):

7,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

नंदुरबार शहर पो.स्टे. नंदुरबार
दिनांक:- 08/08/2023

माझे नाव सिताराम तुकाराम चव्हाण, वय 38 वर्षे, व्यवसाय-नोकरी, ग्रामसेवक, पंचायत समिती, नंदुरबार, मुळ रा. वांदरौली, ता.शहादा, जि.नंदुरबार, ह.मु. प्लॉट नं. 94, विमल विहार, कोरीट नाका, नंदुरबार, मो.नं. 9579226407.

समक्ष पोलीस स्टेषनला हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी पत्नी सौ. पुजा सिताराम चव्हाण, दोन मुले प्रतिक व क्रिष असेसह एकत्र राहतो. सुमारे दोन वर्षापासुन पंचायत समिती, नंदुरबार येथे ग्रामसेवक या पदावर कार्यरत आहे.

मी दिनांक 11/02/2008 ते दिनांक 28/02/2021 रोजीपावतो पंचायत समिती, सातारा येथे ग्रामसेवक या पदावर कार्यरत होतो. त्यानंतर मी विनंती केल्याप्रमाणे जिल्हा परिषद, सातारा ते जिल्हा परिषद, नंदुरबार अशी आंतरजिल्हा बदली झाल्याने मी दिनांक 01/03/2021 रोजी जिल्हा परिषद, नंदुरबार येथे कर्तव्यावर हजर झालो व त्यानंतर माझेकडे भवानीपाडा ता. नंदुरबार ग्रामपंचायतीचा कार्यभार देण्यात आला होता. बदली झाल्यानंतर काही दिवसांनी मी माझे अंतिम पगाराचा दाखला पंचायत समिती, सातारा येथुन आणुन पंचायत समिती, नंदुरबार येथे जमा केला होता. त्यानंतर माहे एप्रिल-2021 पासुन माझा नियमित पगार सुरु करण्यात आलेला आहे.

माहे जानेवारी-2016 ते माहे डिसेंबर-2018 या कालावधीतील सातव्या वेतन आयोगाच्या पाच हप्त्यां◌पैकी मिळणारा पहिला हप्ता मला पंचायत समिती, सातारा यांचेकडुन प्राप्त झाला आहे. परंतु माझे मुळ सेवा पुस्तक हे पंचायत समिती, सातारा येथे जमा असल्यामुळे माझे जुलै-2021 ते मे-2023 अशा कालावधीचा वार्षिक पगार वाढ मला मिळु शकली नाही. म्हणुन मी दिनांक मे-2023 या महिन्यात मुळ सेवा पुस्तक पंचायत समिती, सातारा येथुन आणुन ते पंचायत समिती, नंदुरबार येथील आवक-जावक टेबलला जमा केले आहे.

त्यानंतर माझे सातवे वेतन आयोगाचे उर्वरीत हप्ते व माझे जुलै-2021 ते मे-2023 या कालावधीतील वार्षिक पगार वाढ फरक मिळणेकामी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नंदुरबार यांच्याकडे अर्ज केला होता. त्यानंतर पंचायत समिती, नंदुरबार येथील संबंधीत क्लार्क श्री. दादाभाई पानपाटील यांनी मला शुक्रवारी म्हणजेच दि. 23/06/2023 रोजी बोलावुन माझे सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत हप्ते व पगारवाढीचे फरकाचे बिल काढुन देण्याचे मोबदल्यात माझेकडुन 10,000/- रुपयांची मागणी केलेली आहे. पंचायत समिती, नंदुरबार येथील क्लार्क श्री. दादाभाई पानपाटील हे मागणी करीत असलेले 10,000/- रुपये हि कोणतीही शासकीय फि नसुन लाच आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

तरी दि.24/06/2023 रोजी शनिवार व दि.25/06/2023 रोजी रविवार असल्याने मी तक्रार देणेकरीता आपले कार्यालयात येऊ शकलो नाही. करीता आज रोजी मी अ◌न्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालय येथे तक्रार



Scanned with CamScanner

देण्यासाठी आलेलो आहे. माझी क्लार्क श्री. दादाभाई पानपाटील यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही. तसेच त्यांचेत व माझेत कोणत्याही प्रकारचे वैर अगर खाजगी वादविवाद नसुन, उधार उसनवारीचा व्यवहार नाही.

तरी माझेकडुन 10,000/- रुपये लाचेची मागणी करणारे पंचायत समिती, नंदुरबार येथील क्लार्क श्री. पानपाटील यांना पैसे कोठे?, कधी? व केव्हा? द्यावयाचे याची बोलणी करण्यासाठी आज दिनांक 26/06/2023 रोजी पंचायत समिती, नंदुरबार येथे जावयाचे असल्याने, मी दिलेल्या तक्रारीवर आपले कार्यालयामार्फत योग्य ती कार्यवाही करावी' बाबत मी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे येऊन आपणास माझ्या तक्रारीबाबत थोडक्यात हकिगत सांगितली, त्यावरुन आपण माझे तक्रारीबाबत खात्री करुन मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार यांना दोन शासकिय पंच साक्षीदार मिळणेबाबत लेखी पत्र दिल्याने त्यांनी त्यांचेकडील पंच 1) श्री. रोहन नितीन जाधव, रा. मोटार वाहन निरीक्षक व पंच 2). श्री.प्रकाश निंबा खरात, कनिष्ठ लिपीक असे अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात पाठविले. त्यानंतर आपण माझी दोन्ही पंचाची व स्टाफची एकमेकांना ओळख करुन दिली. त्यानंतर मी पुन्हा माझे तक्रारीबाबत हकिगत सांगितल्यावर मी स्वहस्ताक्षरात लिहिलेली तक्रार आपण दोन्ही पंचाना वाचण्यास दिली. त्यानंतर सदर तक्रारीवर मी, दोन्ही पंचानी व आपण स्वाक्षरी केलेली आहे.

त्यानंतर आपण दोन्ही पंचाना व मला अॅन्टी करप्शन ब्युरो येथे तक्रार आलेनंतरची क्रियारिती व कार्यवाहीबाबतचा क्रम समजावून सांगितला व लाचेचा सापळा कार्यवाहीमध्ये सुरुवातीला पडताळणी करणे आवश्यक असते असे सांगुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर कसे हाताळण्यात येते याची सविस्तर माहिती आपण मला व दोन्ही पंचांना दिली व सुचना देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर हाताळणीचे प्रात्यक्षिक करुन दाखविले.

त्यानंतर आपण मला पंच नंबर 1 श्री. रोहन जाधव यांचेसह पंचायत समिती कार्यालय, नंदुरबार येथे पाठवुन क्लार्क श्री दादाभाई पानपाटील यांची भेट घेवुन त्यांची पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

त्यानंतर त्याच दिवशी म्हणजे दि.26/06/2023 रोजी आपले सुचनेवरुन पोहवा/ठाकरे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर माझे पटाचे आतील बनियानला दोरीच्या सहाय्याने अडकविले व त्यानंतर आपण मला पंच नं. 1 श्री रोहन जाधव यांचेसह क्लार्क श्री दादाभाई पानपाटील यांची भेट घेणेकरीता पंचायत समिती कार्यालय, नंदुरबार येथे माझे ताब्यातील हिरो कंपनीची हन्क मोटार सायकल क्र. एम.एच.11 बी.एक्स. 3662 हिचेने अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नंदुरबार येथुन दुपारी 13:49 वाजेच्या सुमारास सदरचे रेकॉर्डर सुरु करुन रवाना केले व ठरल्याप्रमाणे अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नंदुरबार याच ठिकाणी परत येण्याबाबत सुचना दिल्या. त्यावेळी आपण, पंच नं. 2 श्री. खरात व आपला स्टाफ असे अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नंदुरबार कार्यालयातच थांबुन होते.

पडताळणी करणेकामी मी व पंच नंबर 1 श्री जाधव असे पंचायत समिती कार्यालय, नंदुरबार येथे क्लार्क श्री पानपाटील यांची भेट घेण्याकरीता गेलो असता, मी क्लार्क श्री.पानपाटील यांना सांगितले की, 'दोन वर्ष झाले नाना माझी आर्थिक अडचण आहे. वडीलांची पण तब्येत खराब आहे' तेव्हा क्लार्क श्री. पानपाटील यांनी 'तुमचे बिल कमी झाले आहे ना 57,000/- झाले आहे. 57,000/- काय वाटत तुम्हाला बोला', त्यावेळेस मी क्लार्क पानपाटील यांना सांगीतले की, 'तुम्ही बोला' तेव्हा क्लार्क श्री. पानपाटील यांनी सांगीतले की, 'तुम्हाला पटेल ते देऊन टाका', त्यानंतर मी सांगितले की, 'तुम्ही क्लिअर सांगा' असे विचारले असता क्लार्क श्री. पानपाटील यांनी सांगितले की, 'एक काम करा वरचे सात देऊन द्यायचे पन्नास तुम्ही ठेवुन घ्यायचे', तेव्हा मी त्यांना म्हणालो 'सात म्हणजे सात हजार का'? असे विचारले असता क्लार्क श्री. पानपाटील यांनी 'हो, 57,000/- रु. चे बील आहे, पैकी 7,000/- रु. देवुन द्यायचे. 50,000/- तुम्ही ठेवुन घ्यायचे' तसेच मी पुन्हा क्लार्क पानपाटील यांना सदरचे पैसे कोण-कोणाला देणार बाबत विचारले असता क्लार्क श्री. पानपाटील यांनी सांगितले की, ''बाप नाना, अंकाउटंट, मी, तिकडे सुगे नाना...असं वाटाव लागत'' असे सांगुन लाचेची मागणी केली आहे. त्यानंतर मी व पंच नंबर 01 श्री जाधव असे अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो असता पोहवा/विजय ठाकरे यांनी माझे पटाचे आतील बनियानला लावलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केले ती वेळ 14:21 वाजे होती.

त्यानंतर माझे व क्लार्क श्री. पानपाटील असे आमचेतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण हे आपण, मी व दोन्ही पंच असांनी ऐकले असता लोकसेवक क्लार्क श्री. पानपाटील यांनी माझे वार्षिक पगारवाढीचा फरक व सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत हप्ते असे बिल काढुन देण्याचे मोबदल्यात 7,000/- रुपये लाचेची रक्कम मागणी केल्याचे पडताळणीमध्ये स्पष्ट झाले होते.

परंतु क्लार्क श्री पानपाटील यांनी माझ्याशी बोलतांना ''बाप नाना, अंकाउटंट, मी, तिकडे सुगे नाना...असं वाटाव लागत'' असे सांगितल्याने त्यापैकी बाप नाना व क्लार्क श्री पानपाटील हे दोघे सोबतच काम करतात व दोघेच माझे सातव्या वेतन आयोगाच्या हप्त्याचे बिल व वार्षिक पगार वाढीचा फरक मंजूर करुन देण्याचे पैसे घेतील, परंतु

अकाऊटंट व सुगे नाना वैगरे यांचे नाव क्लार्क श्री पानपाटील हे खोटे बोलत आहेत. त्यानंतर आपण मला वाघ नाना यांचे पद विचारले असता, मी वाघ नाना हे देखील क्लार्क असलेबाबत सांगितले. त्यानंतर आपण मला पुढिल कार्यवाही केव्हा करावयाची बाबत विचारपूस केली असता मी आपणास पंचासमक्ष सांगितले की, मला महत्वाचे शासकीय कामकाज असल्याने, मला वेळ भेटला की मी आपणास कळवितो व त्यानंतर लोकसेवक क्लार्क श्री वाघ यांची लाच मागणी बाबतची पडताळणी करुन पुढिल यशस्वी सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानंतर मी देखील शासकीय सेवक असल्याने मला महत्वाचे शासकीय कामकाज असल्याने अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात पुढील कार्यवाहीकामी येऊ शकलो नाही. परंतु त्यानंतर आज दिनांक 08/08/2023 रोजी मी सकाळी 09.30 वाजताचे सुमारास पुढील सापळा कार्यवाहीकामी अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात हजर झालो असता आपण दिनांक 26/06/2023 रोजी बोलाविलेल्या उप प्रादेशिक परिवहन विभाग, नंदुरबार येथील दोन शासकीय पंच नं. 1) श्री. रोहन नितीन जाधव, सहा. मोटार वाहन निरीक्षक व पंच नं. 2). श्री.प्रकाश भिवा खरात, कनिष्ठ लिपीक यांना हजर राहणेबाबत पत्र दिले असता सदर पंच आज रोजी पुन्हा अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात सकाळी 10.30 वाजता हजर झाले.

त्यानंतर दिनांक 26/06/2023 रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान क्लार्क श्री.पानपाटील यांनी वाघ नाना, अकाऊटंट, सुगे नाना यांना पैसे वाटावे लागतील असे सं◌ागितले होते. परंतु अकाऊटंट व सुगे नाना हे पैसे मागणार नाहीत, याची मला खात्री असल्याने तसेच मला क्लार्क श्री. वाघ यांनी माझा जुन महिन्याचा पगार व सदरचे बिल माझे अकाऊंटला जमा झाले त्याच दिवशी म्हणजे दि.11/07/2023 रोजी, त्यानंतर जुलै महिन्याचा पगार दि.04/08/2023 रोजी झालेनंतर त्याच दिवशी व काल दि.07/08/2023 रोजी माझेकडुन वेळोवेळी फोन करुन लाचेची मागणी केलेली आहे. त्यानंतर मी क्लार्क वाघ नाना यांचीदेखील लाच मागणीबाबतची पडताळणी करणेबाबत विनंती केलेली होती. त्यावरुन सर्वानुमते आज दिनांक 08/08/2023 रोजी क्लार्क श्री. वाघ नाना यांची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर आपण आम्हास पुन्हा दिनांक 26/06/2023 रोजी दिलेल्या सुचनांप्रमाणे सूचना देऊन पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर हाताळण्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर मला व पंच नंबर 01 श्री जाधव यांना पडताळणीकामी रवाना करणेबाबत ठरविण्यात आले. त्यानुसार पोना/संदिप नावाडेकर यांनी सॅनडीस्क कंपनीचे 16 जीबीचे नविन मेमरी कार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकून माझे पॅटतील आतील बनियानला लावून ते 12◌:01 वा सुरु केले. त्यानंतर मी व पंच नंबर 01 श्री. जाधव असे पंचायत समिती कार्यालयातील ग्रामपंचायत विभागात क्लार्क श्री वाघ नाना यांची भेट घेणेकामी गेलो असता श्री वाघ नाना य◌ांनी माझेकडे 'तुझ्या पध्दतीने हजार दे, दोन हजार, तुला जे वाटत योग्य ते देऊन दे बस' असे सांगुन लाचेची मागणी केली आहे. माझी क्लार्क श्री वाघ नाना यांचेशी लाच मागणी पडताळणी झाल्यावर मी व पंच नंबर 01 श्री जाधव असे पुन्हा अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात आलो असता पोना/नावाडेकर य◌ांनी माझे गळ्यातील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले ती वेळ 12◌:38 वाजेची होती. तेथे आम्ही सांगितलेल्या हकीकतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये माझेत व श्री वाघ नाना यांचेत रेकॉर्ड झालेले संभाषण आपण, दोन्ही पंच व आम्ही सर्वांनी ऐकल्यानंतर वाघ नाना यांनी माझे◌ वार्षिक पगारवाढीचा फरक व सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत हप्ते असे बिल काढुन देण्याचे मोबदल्यात 'तुझ्या पध्दतीने हजार दे, दोन हजार, तुला जे वाटत योग्य ते देऊन दे बस' असे सांगुन लाचेची रक्कम मागणी केल्याचे पडताळणीमध्ये स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आज दिन◌ांक 08/08/2023 रोजी पंचायत समितीतील ग्रामपंचायत विभागातील क्लार्क श्री पानपाटील व क्लार्क श्री वाघ यांचेवर यशस्वी सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्याप्रमाणे आज दिनांक 08/08/2023 रोजी आपले सुचनेवरुन मी माझे नोकरीच्या पगारातील बचतीतुन आणलेले◌ 8,000/- रुपये आपले सर्वांचे समक्ष हजर केले. त्यात 500/- रुपये दराच्या 16 चलनी नोटा होत्या. सदर नोटांचे क्रमांक सापळापुर्व पंचनाम्यात नमूद केल्याप्रमाणे आहेत. त्यानंतर आपले सुचनेवरुन पोना/मनोज अहिरे यांनी अ◌ॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हॉयोलेट टॉर्चबाबतचे प्रात्यक्षिक दोन्ही पंचाना व मला दाखविले. त्यानंतर मी सादर केलेल्या 500/- रुपये दराच्या 16 चलनी नोटांना अ◌ॅन्थ्रासीन पावडर लावून पोना/मनोज अहिरे यांनी सदर नोट◌ांपैकी क्लार्क श्री पानपाटील यांना देण्यासाठीचे 7,000/- रुपये माझे पॅटचे डावे खिशात व क्लार्क श्री वाघ यांना देण्यासाठीचे 1,000 /- रुपये माझे पॅटचे पुढील उजव्या खिशात ठेवल्या. तसा सापळापुर्व पंचनामा अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे करण्यात आला आहे.

त्यानंतर पुढिल सापळा कार्यवाही करणेकरीता आपले सुचनेवरुन पोना/संदिप नावाडेकर यांनी सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व सॅनडिस्क कंपनीचे मायक्रो एस.डी.-16 जी.बी.चे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड हजर केले. त्यानंतर सदरचे मेमरीकार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून ते दोन्ही पंचांसमक्ष फॉरमॅट करुन



Scanned with CamScanner

डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व मेमरीकार्ड यामध्ये पूर्वीचे कसलेही संभाषण ध्वनिमुद्रीत नसल्याची पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये फोल्डर नं. 1 ची निवड करून दोन्ही पंच व माझे समक्ष दाखविले, त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केले व तो आपण आपल्या ताब्यात ठेवला.

त्यानंतर आपण दोन्ही पंचांना, मला व आपला स्टाफ अंमलदारांना यशस्वी सापळा कार्यवाहीत काय काळजी घ्यावी तसेच इतर महत्वाच्या सुचना दिल्यात व मला व पंच नं. 1 श्री. रोहन जाधव अंमलदारांना क्लार्क श्री पानपाटील व क्लार्क श्री वाघ यांना लाचेची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायत विभाग, पंचायत समिती, नंदुरबार येथे पाठविण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

त्यानंतर आपण आपलेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पोना/संदिप नावाडेकर यांचे ताब्यात दिले. आपले सुचनेवरून पोना/संदिप नावाडेकर यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर माझे पॅटचे आतील बनियानला दोरीच्या सहाय्याने अडकवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये फोल्डर नं 1 ची निवड करून ते सुरू केले. ती वेळ 16.22 वाजेची होती. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री.रोहन जाधव यांनेसह क्लार्क श्री पानपाटील व क्लार्क श्री वाघ यांना लाचेची रक्कम देणेसाठी ग्रामपंचायत विभाग, पंचायत समिती कार्यालय, नंदुरबार येथे माझे ताब्यातील होन्डा कंपनीची अॅक्टीव्हा मोटार सायकल क्र. एम.एच.39 ए.ई. 0990 हिचेने अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नंदुरबार येथुन रवाना केले.

आमचे पाठोपाठ आपण, पंच नं. 2 श्री. प्रकाश खराल, पोहवा/विजय ठाकरे व पोना/अमोल मराठे असे आपले खाजगी चारचाकी वाहन आय-20 वाहन क्र. एम.एच.18 ए.जे. 4277 ने व पोना/संदिप नावाडेकर व पोना/देवराम गावीत हे पोना/देवराम गावीत यांचे ताब्यातील लाल रंगाची पल्सर हया एम.एच.39 के. 4244 हया दुचाकी वाहनाने असे थोडया अंतराने रवाना होवून पंचायत समिती कार्यालय, नंदुरबार कार्यालयाचे बाहेर कोणास संशय येणार नाही, अशा अंतरावर वाहने उभे केले.

त्यानंतर मी व पंच नं. 1 श्री. रोहन जाधव असे पंचायत समिती, नंदुरबार कार्यालयाचे ग्रामपंचायत विभाग कक्षात गेलो असता आमच्या पाठोपाठ येवून आपण स्वतः पंच क्रमांक 02 श्री. खराल व इतर स्टाफ असे पंचायत समिती नंदुरबार कार्यालयाचे आजुबाजुस दबा धरून थांबले होते.

त्यानंतर पंचायत समिती मध्ये क्लार्क श्री. पानपाटील व क्लार्क श्री. वाघ यांना लाचेची रक्कम देण्यासाठी गेलो असता सदर ठिकाणी क्लार्क श्री. वाघ हे त्यांचे खुर्चीवर बसलेले दिसून आले, परंतु क्लार्क श्री.दादाभाई पानपाटील हे त्यांचे पंचायत समितीतील ग्रामपंचायत विभागात शोधून बघितले असता दिसून आले नाहीत. म्हणुन आम्ही पंचायत समिती कार्यालयाचे आवारातच उभे राहिलो.

त्यानंतर थोडयावेळाने क्लार्क श्री. पानपाटील हे पंचायत समिती कार्यालयाचे आवारात आले. त्यावेळी माझे क्लार्क श्री. पानपाटील यांचेशी कामासंबंधाने चर्चा झाली, चर्चेदरम्यान मी क्लार्क श्री. दादाभाई पानपाटील यांना 'घर झाल पहिल बिल काढल' तर तेव्हा क्लार्क श्री. पानपाटील यांनी मला सांगितले की, 'हो ना, पण ते तुम्ही काही केलच नाही ना, करतच नही ना' तेव्हा मी क्लार्क श्री पानपाटील यांना 'करतो ना' असे सांगितले असता क्लार्क श्री. पानपाटील यांनी 'केव्हा आता?' असे सांगीतले असता मी क्लार्क श्री पानपाटील यांना 'दुसर बिल केव्हा काढता?' असे विचारले तेव्हा क्लार्क श्री. पानपाटील यांनी 'दुसरा पगार पण देऊन दिला, काय देऊन दिल, असं नही व्यवहार' असे सांगितले. त्यावेळी मी 'करतो ना आणले आहेत ना आज' असे सांगीतले, त्यावेळी क्लार्क श्री. पानपाटील यांनी 'देऊन दयाना मग' असे सांगुन मला पंचायत समिती कार्यालयाचे आवारातील डावे बाजुस असलेले वाहन पार्किंग जवळील लोखंडी गेटजवळ घेवुन गेले. आमचे पाठोपाठ पंच नं. 1 श्री जाधव हे देखील पंचायत समिती कार्यालयाचे आवारातील डावे बाजुस असलेले वाहन पार्किंग जवळील लोखंडी गेटजवळ आले. तेथे पुन्हा मी क्लार्क श्री. पानपाटील यांना 'दुसर बिल कधी करताय' असे विचारले असता क्लार्क श्री. पानपाटील 'टिप्पणी ठेवतो ना मग पुढच्या महिन्यात होऊन जाईल' असे सांगितले, त्यानंतर मी क्लार्क श्री. पानपाटील यांना सातव्या वेतनाचे हप्त्याबाबत विचारणा केली असता क्लार्क श्री. पानपाटील 'एक का दोन झाले आहे ना ते' असे सांगितले. तेव्हा मी क्लार्क श्री. पानपाटील यांना 'तुम्ही म्हणाल्याप्रमाणे आणले हेत, मोजुन बघा असे सांगुन लाचेची मागणी केल्याप्रमाणे मी माझे शर्टचे पुढील बाजुचे डावे खिशात ठेवलेली लाचेची रक्कम 7,000/-रुपये त्यात 500/-रुपये दराच्या 14 चलनी नोटा उजव्या हाताने काढुन त्या क्लार्क श्री. पानपाटील यांचे समोर धरले असता सदर लाचेची रक्कम क्लार्क श्री. पानपाटील यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारून मी त्यांना सदर रक्कम मोजायला लावली असता 'मोजायचे नसतात असे सांगुन' त्यांचे पॅन्टचे पुढील बाजुस असलेल्या उजव्या खिशात ठेवल्या.

त्यानंतर मी, क्लार्क श्री. पानपाटील व पंच नं. 1 श्री जाधव असे पुन्हा पंचायत समिती, कार्यालयातील ग्रामपंचायत विभागात परत येत असतांना ग्रामपंचायत विभागाचे दरवाजाचे बाहेरून मला अगोदर दिलेल्या सुचनेप्रमाणे माझ्या उजव्या हाताचा अंगठा (थम) दाखवुन लाच दिल्याचा पुर्वनियोजीत इशारा केल्याने, आपण, पंच



Scanned with CamScanner

नं 2 श्री. प्रकाश खरात आणि सापळा पथकातील कर्मचारी सज्जित होवून ग्रामपंचायत विभागात आमचे जवळ आले व आपले सुचनेवरुन पोना/संदिप नावाडेकर यांनी माझे कब्ज्यातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद ती वेळ 16.45 वाजेची होती, त्यानंतर सदर रेकार्डर आपले ताब्यात दिले. त्यानंतर पोना/संदिप नावाडेकर यांनी क्लार्क श्री पानपाटील यांचा उजवा हात व पोना/देवराम गावीत यांनी त्यांचा डावा हात मनगटापासुन घट्ट पकडुन त्यांना अटकावुन ठेवले, त्यावेळी आपण संपुर्ण स्टाफ आल्याने ते घाबरलेल्या अवस्थेत व त्यांचे हात-पाय थरथरलेल्या अवस्थेत होते.

त्यानंतर आपण क्लार्क श्री पानपाटील यांना आपली ओळख समाधान वाघ, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार अशी सांगून आपले ओळखपत्र दाखवुन दोन्ही पंच व स्टाफ अंमलदारांची ओळख करुन दिली. त्यानंतर तात्काळ क्लार्क श्री वाघ यांना देखील ताब्यात घेवून त्यांनाही आपण आपली ओळख दिली.

त्यानंतर आपण क्लार्क श्री पानपाटील यांना त्यांचे नाव, गाव व हुद्दा विचारता त्यांनी त्यांचे नाव दादाभाई फुला पानपाटील, वय-54 वर्षे, व्यवसाय-नोकरी, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, नंदुरबार रा. मु. पो. विखरण ता. जि. नंदुरबार असलेबाबत सांगितले. त्यानंतर आपण नमुद क्लार्क श्री वाघ यांना त्यांचे नाव, गाव व हुद्दा विचारता त्यांनी त्यांचे नाव सुकदेव भुरसिंग वाघ, वय-43 वर्षे, व्यवसाय-नोकरी, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, नंदुरबार रा. प्लॉट नं. 131 शनिराज नगर, होळ शिवार, नंदुरबार असे सांगितले.

त्यानंतर आपण, दोन्ही पंच पंचायत समिती, नंदुरबार कार्यालयातील, ग्रामपंचायत विभागात जाऊन तेथे पंच नं. 1 श्री जाधव यांचेकडे सापळापुर्व पंचनामा देवून त्यात नमुद नोटांचे नंबर, त्यांना वाचण्यास सांगीतले, त्यानुसार पंच नं. 2 श्री प्रकाश खरात यांनी त्यांचे ताब्यातील लाचेची चलनी नोटांचे क्रमांक पडताळले असता ते एक सारखेच असल्याची खात्री करुन पुढिल कार्यवाही केली.

त्यानंतर सदर ठिकाणी पंचनामा करण्यासारखी परिस्थीती नसल्याने व अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यालय जवळच असल्याने सापळा कार्यवाहीचे पुढील कामकाज अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयातच करणेबाबत सर्वानुमते ठरल्याने आपण आपले खाजगी वाहनात आपण, क्लार्क श्री पानपाटील, क्लार्क श्री वाघ, पोहवा/विजय ठाकरे व पोना/अमोल मराठे असे आपले खाजगी वाहनाने, पोना/देवराम गावीत व पोना/संदिप नावाडेकर असे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने तसेच मी व पंच नं. 1 श्री. जाधव हे माझ्या ताब्यातील मोटार सायकलीने पंचायत समिती कार्यालय, नंदुरबार येथुन निघून अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालय येथे परत आलो. त्यानंतर आपण मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर आपण आपली पुढील कार्यवाहीचे कामकाज अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय, नंदुरबार येथे केले आहे.

तरी श्री. दादाभाई फुला पानपाटील, वय-54 वर्षे, व्यवसाय-नोकरी, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, नंदुरबार रा. मु. पो. विखरण ता.जि. नंदुरबार व श्री. सुकदेव भुरसिंग वाघ, वय-43 वर्षे, व्यवसाय-नोकरी, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, नंदुरबार रा. प्लॉट नं. 131 शनिराज नगर, होळ शिवार, नंदुरबार या दोघांनी माझे वार्षिक पगारवाढीचा फरक व सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत हप्ते बिल काढुन देण्याचे मोबदल्यात क्लार्क श्री पानपाटील यांनी 7,000/- रुपये व क्लार्क श्री वाघ यांनी 'तुझ्या पध्दतीने हजार दे, दोन हजार, तुला जे वाटत योग्य ते देऊन दे बस' असे सांगून लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम पंचायत समिती, नंदुरबार आवारातील उजव्या बाजूस असलेल्या वाहन पार्कीगजवळील लोखंडी गेटजवळ आज दि. 08/08/2023 रोजी दुपारी 16:22 या ते 16:45 वाजेचे दरम्यान पंच साक्षीदारासमक्ष स्विकारुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करुन अनाधिकाराने पदाचा दुरुपयोग केला. म्हणून त्यांचेविरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील संगणकावर टाईप केलेली फिर्याद मी वाचुन पाहिली असुन ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ravindra Bhanudas Kalamkar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ravindra Bhanudas
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner